MARATHI VISHWA
NEW JERSEY

॥ संहता हि महाबला: ॥

# मराठी विश्व वृत्त

द्वैमासिक वर्ष २० वे अंक दुसरा
ऑक्टोबर - नोव्हेंबर २००८

Marathi Vishwa Celebrates 30th
तिसावं वरीस थाटाचं
year 1978 - 2008

## संपादकीय

**मराठी विश्व नवीन वर्षाची सुरुवात.........**

बघता बघता कार्यकारिणी मंडळात सहभागी होऊन एक वर्ष झालं देखील ! या एका वर्षात आपल्या मराठी विश्वनी भरपूर कार्यक्रम केले. प्रत्येक कार्यक्रम व्यवस्थित पार पडावा यासाठी दर महिन्यात आमची कमीत कमी एक तरी मीटिंग असते आणि कधी कधी तर त्याव्यतिरीक्त tele-conference देखील! या एका वर्षात खूप शिकायला मिळालं. कितीतरी नवीन लोक भेटले, कितीतरी नवीन ओळखी झाल्या. कर्तृत्ववान आणि प्रतिभावंत लोकांच्या सानिध्यात वावरायला बहुधा सगळ्यांनाच आवडतं. मलापण! शिवाय आपल्या समाजासाठी, आपल्या मित्र-मंडळींसाठी काहीतरी केल्याचं समाधान मिळतं ते निराळंच ! दर वेळी कार्यक्रम झाल्यानंतर जी तृप्ती वाटते, त्याची तुलना कशाशीच करु शकत नाही. तो आनंद शब्दात व्यक्त करणं खरंच अवघड आहे. कार्यकारिणीत सहभागी झाल्याचा मला अतिशय आनंद आहे.

या वर्षी मराठी विश्वच्या कार्यकारिणी मंडळाच्या २ सदस्यांची मुदत संपून २ नवीन सदस्य या मंडळात सहभागी झाले आहेत. स्मिता कसबेकर आणि छाया अराणके ह्या दोघी या वर्षी निवृत्त होत आहेत.

छाया अराणके यांनी इतर अनेक कामांशिवाय प्रामुख्याने “रंगदीप”, आपला दिवाळी वार्षिक अंक आणि द्वैमासिक “वृत्त” चं काम गेली कितीतरी वर्षे चोख सांभाळले. गेल्या वर्षभरात मला सुदैवाने छायाबरोबर काम करण्याची संधी मिळाली आणि लक्षात आलं की ही व्यक्ती स्वत:चा अमूल्य वेळ देऊन आपल्यासारख्या रसिकांच्या हातात उत्तमोत्तम अंक मिळावा म्हणून किती झटते आहे. स्मिता कसबेकर यांनी देखील इतर कामांशिवाय मुख्यत: वसंतोत्सव आणि आनंदी गोपाळ स्कॉलरशिपचं काम बघितलं. प्रतोद कसबेकर आणि शेखर अराणके यांचे देखील मनापासून आभार!

यावर्षी डॉ. श्री. अशोक देशपांडे आणि डॉ. सौ. वृंदा देवल यांना “मराठी विश्व मित्र” पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. श्री. नितीन अष्टेकर यांना यावर्षी associate-director म्हणून गौरवण्यात आलं. गेल्या वर्षी त्यांनी रंगदीप, वृत्त, झलक या कार्यक्रमात, कार्यकारिणीत नसतानाही सर्वतोपरी मदत केली. या वर्षी नवीन सुरु झालेली “Prabhakar S. Wagh” स्कॉलरशिप “मेघना लिमये” यांना देण्यात आली.

या सर्वांचं मन:पूर्वक अभिनंदन !! (....कृपया पान ३ पहा)

*********************************

प्रकाशक : मराठी विश्व
संपादक : राजश्री कुळकर्णी
सहाय्य : नील खातू, राजेश कुलकर्णी, जयश्री कुळकर्णी-अंबासकर आणि मराठी विश्व कार्यकारिणी सभासद
साहित्य पाठविण्याचा पत्ता : राजश्री कुळकर्णी
E-mail : rajeshree.mv@gmail.com

*********************************

मराठी विश्व वृत्ताकडे पाठवलेल्या साहित्याचं आनंदानं स्वागत केलं जाईल. कृपया आपला पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि email address त्याबरोबर अवश्य कळवा.

आपल्या वृतासाठी इंग्रजी साहित्य देखील स्वीकारले जाईल. प्रसिध्द झालेल्या साहित्यास आर्थिक मोबदला दिला जाणार नाही.

हाती आलेल्या साहित्यात बदल करण्याचे अधिकार संपादक मंडळ राखून ठेवत आहे.

वृत्तात व्यक्त झालेल्या मतांशी मराठी विश्व सहमत असेलच असं नाही. आपल्या काही विशेष घटनांना प्रसिध्दी देण्याची इच्छा असल्यास त्यानुसार मजकूर पाठवावा.

*********************************

**Rental Information**

Marathi Vishwa Community Center (MVCC)
Address: 143 State Route 35,
Laurence Harbor,
NJ 08879-2834

| Category | Weekends[1] | Weekdays[2] |
|---|---|---|
| Members | $250.00 | $150.00 |
| Non Members | $350.00 | $250.00 |

Discount rent will be considered for Public-interest programs arranged by MV members for the benefit of community and are open to all.(Only Marathi Vishwa, NJ members can rent in this category)

[1] Weekend: Friday to Sunday & Public Holidays
[2] Weekdays: Monday to Thursday

**Contact: Vikas Wagh :** (732) 591-1940
**Vijay Naringrekar :** (732)438-0605

मराठी विश्व लायब्ररी

दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी सकाळी १० ते १२ उघडी असेल.



| मराठी विश्व कार्यकारिणी मंडळ | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | अशोक चौधरी | (732) 441-4889 |
| उपाध्यक्ष | नितीन आपटे | (908) 227-3034 |
| चिटणीस | स्मिता साठे | (732) 355-1782 |
| कोषाध्यक्ष | स्नेहल वझे | (732) 591-2357 |

| कार्यकारिणी सभासद | |
|---|---|
| रवी कुलकर्णी | (609) 208-9194 |
| नितीन देसाई | (732) 297-9297 |
| राजश्री कुळकर्णी | (732) 407-4875 |
| सुहास मुजुमदार | (201) 546-1329 |
| विकास वाघ | (732) 591-1940 |
| मोहिनी परचुरे | (732) 355 9844 |
| दिलीप तावरगिरी | (609) 974 4812 |

| विश्वस्त | |
|---|---|
| माधुरी जोशी | (973) 575-6802 |
| प्रतिमा लेले | (908) 568-5946 |
| पुनीत मराठे | (609) 799-8159 |

| मराठी विश्वचे कम्युनिटी सेंटरचे कार्यकारिणी मंडळ | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | विकास वाघ | (732) 591-1940 |
| उपाध्यक्ष | डॉ.उदय गोगटे | (732) 398-1027 |

| मराठी विश्वचे कम्युनिटी सेंटरचे कार्यकारिणी सभासद | |
|---|---|
| डॉ. प्रकाश लोथे | (732) 741-0065 |
| डॉ.विजय नारिंग्रेकर | (732) 438-0605 |

## President's Message

नमस्कार मंडळी,

मराठी विश्वच्या नवीन वर्षातील नवीन वृत्त नवीन साच्यात व नवीन रंगात आपल्या समोर सादर करताना आम्हांला अतिशय आनंद होतो आहे.

नवीन आज चंद्रमा नवीन आज चांदणे
नवी नवीन कल्पना नवेच स्वप्न लोचनी !

या वर्षी मराठी विश्वने ३० वर्षे पुर्ण केली. ३० वर्षाच्या या यशस्वी वाटचालीत मराठी विश्वने लक्षणीय प्रगती केली आहे. भारतीय परंपरा व संस्कृती यांच्यावर आधारीत अशा अनेक कार्यक्रमांची योजना विश्व सर्व वयोगटातील सभासदांसाठी करीत आले आहे. पण त्याच बरोबर रुढींचे अवडंबर न माजवता अनेक नवीन प्रकल्प मराठी विश्वने वेळोवेळी यशस्वीरित्या योजले आहेत. ज्याप्रमाणे मावळता सूर्य अनुभवाची पहाट देऊन जातो, त्याप्रमाणे पूर्व अनुभवावरून योग्य तो धडा घेऊन मराठी विश्वने पुढील कार्यक्रम योजले आहेत आणि यातील महत्वाचा टप्पा म्हणजे आजच्या नवीन वृत्तातील लक्षणीय बदल. केवळ काळाची गरज ओळखुन आता आम्ही वृत्त हे पुर्णपणे "online" करीत आहोत. या वृत्तात पानांच्या संख्येची मर्यादा नसल्यामुळे अनेक नवीन सदरे सुरु करण्यात येणार आहेत.

गेल्या अनेक वर्षांच्या उल्लेखनीय कामगिरीनंतर, यावर्षी संपादकपदावरुन सौ. छाया अराणके ह्या निवृत्त होत आहेत. अत्यंत कुशलतापुर्वक सांभाळलेल्या ह्या जोखमीच्या व कष्टप्रद कामगिरीबद्दल छायाचे मनःपुर्वक धन्यवाद ! या वर्षीपासुन वृत्ताच्या संपादकपदाची धुरा सांभाळणार आहेत, तेवढ्याच उत्साही व हसतमुख सौ. राजश्री कुळकर्णी. या वृत्तामधे राजश्रीने अनेक स्पृहणीय बदल करुन त्याला एक नवीन चैतन्य दिले आहे. त्या बद्दल तिचे कौतुक ! छायाने अतिशय सहजरित्या सांभाळलेले हे शिवधनुष्य, राजश्री तेवढ्याच ताकदीने सांभाळेल अशी मला मनोमन खात्री वाटते.

नवीन वृत्त, झलक, पाककला स्पर्धा, college seminar, सूरबहार,...इ.इ. या सारखे अनेक नवीन प्रकल्प आपल्यासमोर आणण्यास मराठी विश्व कार्यकरिणीला नक्कीच आवडेल. नवनवीन कल्पना यशस्वी होण्यासाठी आपल्या सर्वांचे कृतीशील सहकार्य अपेक्षित नव्हे तर आवश्यक आहे. मराठी विश्वच्या नवीन व जुन्या कार्यक्रमांच्या "candid" प्रतिक्रीया कळवुन मराठी विश्व कार्यकारिणीशी आपला संवाद वाढवावा ही कळकळीची विनंती !

आपल्या सर्वांच्या सहकार्याने मराठी विश्वची प्रगती अशीच वर्षानुवर्षे होत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

**अशोक चौधरी**
**अध्यक्ष**

## संपादकीय

*(...पहिल्या पानावरून पुढे सुरु)*

हे वर्ष मराठी विश्वसाठी विशेष आहे. मराठी विश्वचं हे तिसावं वर्ष. याशिवाय या वर्षी आपण पहिल्यांदाच ऑनलाईन वृत्त सुरु करणार आहोत.....साहित्य वृत्त, तेही जाहिरातींशिवाय ! यावर्षी आपण वृत्ताचा font देखील बदलला आहे…बरहा (baraha). हा font वापरायला अतिशय सोपा आहे. मदत हवी असल्यास कृपया मला email करा.

माझ्या "विश्व" च्या लोकांपुढे, साहित्यासाठी मी फक्त एकदा मदतीचा हात मागितला आणि लोकांचा भरपूर प्रतिसाद मिळाला. पुढच्या अंकात अजून जास्त साहित्याची अपेक्षा आहे. कृपया नोव्हेंबर १५ च्या आत मला तुमचं साहित्य पाठवा. "Achievements- कौतुक" या आणि अशा अनेक नवीन सदरांची आम्ही आता सुरुवात करीत आहोत. पण कोणतं साहित्य प्रसिध्द करायचं, याचे हक्क कार्यकारिणी मंडळ राखून ठेवत आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

एक विशेष विनंती: आपण "मराठी विश्व **वृत्त**" हे नाव बदलणार आहोत. मराठी आणि विशेषत: इंग्रजी साहित्याचाही यांत समावेश असणार आहे. **विनंती ही, की या वृत्तासाठी नाव सुचवा.**

तुम्हाला या वृत्ताबाबत किंवा इतरही काही सूचना असतील तर जरुर कळवा, आम्ही वाट बघतो आहोत.

**राजश्री कुळकर्णी**
rajeshree.mv@gmail.com

# अनुक्रमणिका


- मराठी विश्व-न्युजर्सी:गणेशोत्सव २००८ ........................................ *नितीन अष्टेकर*
- नाते फुलांशी........................................ *अरुंधती देशपांडे*
- कविता (मनाला कळेना, असहकार) ........................................ *संदीप चित्रे. विजया पात्रीकर*
- कविता (सागरगोटे) ........................................ *सुमती कमलाकर देशपांडे*
- Movie recommendations - House of Sand & Fog ........................................ *Pradeep Vaze*
- Movie recommendations – The Illusionist ........................................ *Rajan Wadnerkar*
- पुस्तक परीक्षण (युवंता) ........................................ *डॉ. प्रदीप कर्णिक*
- लेख -फरक ........................................ *सौ. अनघा चित्रे*
- Achievements-कौतुक ........................................ *रमेश प्रधान*
- लेख - तुका झालासे कळस ........................................ *श्रीमती प्रतिभा गारटकर*
- MV teens Wii ........................................ *Rohan Kshirsagar*
- मराठी विश्व गणपती - २००८ ........................................ *संदीप चित्रे*
- संगीताचे कार्यक्रम ........................................ *सुजन राणे*
- Fitness ........................................ *Rajendra Wadnerkar*
- मनोगत ........................................ *डी. जे. कुलकर्णी*
- भोजन प्रपंच आणि पंचाईत........................................ *स्नेहल वझे*

## मराठी विश्व-न्युजर्सी: गणेशोत्सव २००८




१३ सप्टेंबरला मराठी विश्वचा गणेशोत्सव अतिशय थाटामाटत साजरा झाला. यावर्षी “गणपती बाप्पा मोरया” या गर्जनेबरोबर आणखी एक घोषणा होती - “तिसावं वरीस थाटाचं !” भारताबाहेर असलेल्या मराठी मंडळांपैकी “मराठी विश्व” हे खूपच मोठे मराठी मंडळ. या वर्षी हे मंडळ आपला तिसावा वर्धापनदिन साजरा करीत आहे.

गणेशोत्सव म्हणजे इथला सर्वात मोठा कार्यक्रम. गणपतीची प्रतिष्ठापना, प्रसाद आणि भोजन, सांस्कृतीक कार्यक्रम आणि त्यानंतर गणेश विसर्जन असं या कार्यक्रमाचं स्वरूप असतं. या वर्षी सर्वाधिक म्हणजे जवळजवळ १३०० माणसं या सोहळ्यात सहाभागी झाली होती. गणपतीची आरास, मखर, प्रवेशद्वारातील कमानी हे सर्व अतिशय सुंदर - एखाद्या नेपथ्यकारानं करावं तितक सफाईदारपणे केलेलं होतं. कॉरीडॉरमध्ये कपडे आणि दागदागिन्यांचे स्टॉल्स गर्दी खेचून घेत होते. अनेक ठिकाणी तिसाव्या वर्धापनदिनाचा कलात्मकतेने केलेला लोगो लक्ष वेधून घेत होता. “पैठणी” हा जणू ड्रेसकोड असावा इतक्या संख्येने स्त्रिया पैठणी परिधान करून मिरवत होत्या. भोजनगृहात गर्दी होती पण सूत्रबध्दता आणि नियोजन यामुळे कोठेही गोंधळ नव्हता.

मुख्य कार्यक्रमाची वेळ झाली तसा कॉरीडॉरमध्ये ढोल-ताशांचा आवाज घुमला. एक छोटीशी मिरवणुक श्री गणेशाच्या दर्शनार्थ हळुहळु पुढे सरकत होती. नखशिखांत ऐतिहासिक वेश परिधान केलेले मावळे ढोल ताशांचा लयबध्द जयघोष करीत होते. अग्रभागी पुढीलवर्षी फिलाडेल्फिया येथे होणा-या मराठी अधिवेशनाचे संयोजक, श्री मुकुंद कुटे आणि मराठी विश्वाचे अध्यक्ष डॉ. अशोक चौधरी होते. मूर्तीपाशी पोहोचतात श्री. कुटे यांनी बीएमएम च्या वतीने सर्व मराठी विश्व सभासदांस अधिवेशनाचे आमंत्रण दिले.

यानंतर लगेच सभागृहात मुख्य कार्यक्रम सुरु झाला. डॉ. चौधरी यांनी स्वागत, नवीन कार्यकारी मंडळाची ओळख करून देउन मुख्य कार्यक्रमास सुरुवात केली. भारतातील नवीन पिढीच्या गायिका मंजुषा कुलकर्णी-पाटील यांचा “हे सूरांनो चंद्र व्ह”' हा कार्यक्रम हे यावर्षीचं मुख्य आकर्षण होतं. वृंदावनी सारंग रागातल्या बंदीशीने त्यांनी गायला सुरुवात केली. अत्यंत गोड आवाज, तंत्रशुध्द गायनशैली, तिनही सप्तकात सहजपणे फिरणारा त्यांचा सूर. बघता बघता अवघं प्रेक्षकगृह मंत्रमुग्ध झालं. नंतर मिश्र खमाजातल्या “कौन गली गयो शाम” या ठुमरीनं रसिकांच्या काळजाचा ठाव घेतला. यानंतर “चंद्र कसा मी”, “हे सुरांनो चंद्र व्हा”, “वद जाऊ कुणाला”, “सावळा ग रंग तुझा” या गीतांनी प्रचंड दाद मिळवली. “बडोद्याची नोकरी कठीण” ही बैठकीतली लावणी, शाहीर होनाजी बाळा यांची एक गवळण असा कार्यक्रमाचा रंग वाढतच गेला. शेवटी 'जोहार मायबाप जोहार' नं अक्षरशः कार्यक्रमाचा कळस गाठला. पद संपताच अवघ्या प्रेक्षकांनी उभे राहून टाळ्यांचा गजर सुरुच ठेवला. मैफिल संपली पण जणू गाणं सुरुच होतं. सौ. मंजुषा कुलकर्णी-पाटील यांना न्युजर्सी च्या मराठी विश्वने “स्वरमंजुषा” हा किताब बहाल केला.

औपचारीक समारोप केल्यानंतर गणपतीची आरती झाली कार्यक्रम संपला. अर्थात आता वेध लागलेत दीपोत्सवाचे !

**नितीन अष्टेकर**

# नाते फुलांशी

"पुष्परचना" हा जपानी संस्कृतीचा अविभाज्य घटक मानला जातो. आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोडीने ह्या कलेचा जपानी लोकांनी जगभर प्रसार केला.

"पुष्परचना" कलेचा जन्म कसा झाला याचा इतिहासही रंजक आहे. साधारणतः पाचशे वर्षापूर्वी जपानमध्ये बुध्द मंदिरात देवाला फुले अर्पण करण्याच्या पध्दतीतून याचा उगम झाला. "इकेबाना" या नावाने ही कला जगभर ओळखली जाते. "इके" म्हणजे मांडणे व "बाना" म्हणजे फुले! या पानाफुलांच्या सुबक मांडणीतून साकारलेला अविष्कार म्हणजे "इकेबाना"! निसर्गाशी नाते जोडत, पानाफुलांचे सौंदर्य खुलवत, हृदयातील भावना व्यक्त करणे म्हणजे "इकेबाना"!

जपानमध्ये क्योतो शहरात रोकोकूडो नावाचे प्रसिध्द बुध्द मंदीर आहे. ह्या देवळात अनेक कार्यक्रम होत असत. त्यावेळी या मंदिरातील पुजाऱ्याने प्रथम पुष्परचना करायला सुरुवात केली. या रचना देवळात येणाऱ्या भक्तांचे लक्ष वेधून घेऊ लागल्या व त्याची लोकप्रियता वाढू लागली. पुष्परचनेचे तंत्र यातुनच विकसित होत गेले. या मंदिराच्या शेजारीच आता इकेनोबो स्कूलची अकरा मजली इमारत आहे. "इकेनोबो" हे पुष्परचना करणारे सर्वात जुने घराणे मानले जाते. (सोगेत्सू, ओहारा अशी काही पुष्परचना करणारी इतर घराणी पण आहेत.) आज जगामध्ये "इकेनोबो" स्कूलच्या चाळीस वेगवेगळ्या देशांमध्ये शाखा आहेत. भारतामध्ये पुणे, बैंगलोर व कलकत्ता अशा तीन ठिकाणी याच्या शाखा आहेत.

पुष्परचनेचे पौर्वात्य(इकेबाना) आणि पाश्चिमात्य असे दोन प्रकार मानले जातात. यांमध्ये पाश्चिमात्य पुष्परचनेमध्ये पुष्परचनेच्या आकाराला महत्व दिले जाते व पौर्वात्य पुष्परचनेमध्ये कोन व रेषा या दोन गोष्टींना महत्व देऊन पुष्परचना साकारल्या जातात.





सोबत दिलेल्या पुष्परचना मुक्तरचना या प्रकारात येतात. या रचनांमध्ये ऑर्किड्ची फुले व मनीप्लँट्ची पाने याचा वापर केला आहे.

पुष्परचना करताना लागणारे साहीत्य व कोणकोणत्या गोष्टी लक्षात ठेऊन रचना करायाच्या ह्याची माहिती आपण पुढील लेखात घेऊ!

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**
**इकेनोबो न्यूयॉर्क चॅप्टर**

# कविता

पार्श्वभूमी : सप्टेंबर २००८ साली अमेरिकेत घडलेली वित्तसंस्थांची ऐतिहासिक पडझड.
वृत्त : भुजंगप्रयात
चाल : मनाचे श्लोक

**मनाला कळेना** (श्लोक)

कसे हे घडावे । मनाला कळेना ।
बघा कोसळे । कागदी हा मनोरा ॥ १

जना सज्जनांच्या । चुकाही नसे त्या ।
तरी वित्तसंस्था । बुडाल्या कशा ह्या ॥ २

कुणी कर्ज घ्यावे । कुणी कर्ज द्यावे ।
कुणीही कशाची । तमा बाळगेना ॥ ३

नमस्कार ज्यांनी । बरे घेतले गा ।
चमत्कार त्यांना । असे भोवले का ॥ ४

असा सांडला । सर्व पैसा तयांचा ।
जसा की । चणा वा फुटाणा असावा ॥ ५

इथे चित्त द्यावे । जना सज्जना हो ।
करा वित्त ऐसे । उद्याचा सुमेवा ॥ ६

नसावी जुगारी । असावी सुरक्षा ।
जरा पारखूनी । बसा गुंतवाया ॥ ७

जरी चंचला श्री । सुखाचाच ठेवा ।
जपूनी तिजोरी । तिला नीट ठेवा ॥ ८

**संदीप चित्रे**

**असहकार**

माणसे असेही कां वागतात??
साध्या भोळ्या वागणा-याचा फायदा का घेतात?

चांगुलपणा जणू त्यांच्या कोषातच नाही,
दुस-यांना कधी ते समजुन घेतच नाहीत,

घेताना हात पुढे होतात, देताना मात्र मागे जातात,
हात वर करुन सांगताना त्यांना काहीच कसे वाटत नाही?

गरीब बिचा-या माणसांना फसवेगिरी माहीत नाही,
सत्याची कास धरणा-याला उचलेगिरी माहीत नाही

कधीतरी फसवेगिरी उजेडात येणार
सत्य हेच शेवटी विजयश्री मिळवणार

**विजया पात्रीकर**

# कविता

**सागरगोटे**

चला सयांनो, पुन्हा एकदा सागरगोटे खेळू ॥ ध्र ॥
सागरगोटे सुख-दु:खाचे,
क्षणात खाली, क्षणी वर नाचे
कौशल्याने झेलायाचे,
नऊच क्षण हे नव्या दमाने पुन्हा पुन्हा झेलू ॥ १ ॥

बालपणीचे दिन सोन्याचे
क्षणी हसण्याचे क्षणी रुसण्याचे
स्वानंदे मोती टिपण्याचे
आता वाटते पुन्हा एकदा, ते सोने मोती वेचू ॥ २ ॥

दिवे लागती शुभंकरोती
संथ लयीवर स्तोत्रे डुलती
देवापुढती एकच वाटी,
मिटल्या नयनी दिसे सारखी, प्रसाद कॆंव्हा खाऊ ॥ ३ ॥

स्वप्नरंजनी रमले जीवन
सौख्य सवे अंगणी
प्राण सखा जिवा भेटला, रत्न जसे कोंदणी
मनामनाला मोहोर आला लागे हृदय कळी उमलू ॥ ४ ॥

डाव रंगला संसाराचा
सुयश आले माझ्या हाता
फळाफुलांनी वेल बहरली,
ती पाहता पाहता
कृतार्थ झाले अवघे जीवन सूर लागले जुळू ॥ ५ ॥

गती वाढली, वळण बदलले
अलगद यौवन निसटून गेले
प्रौढत्वाचे थांबे दिसले
हुरहुर कसली कुणा सांगू ती, लागे ज्याचे त्याला कळू ॥ ६ ॥

शैशव सरले, यौवन सरले
संध्यादीपही मंद जाहले
रितेपणाचे काहुर उठले
विरंगुळ्याला आठवणींचे सागरगोटे खेळू ॥ ७ ॥

आपण सारे सागरगोटे
खेळवणारा तो परमेश्वर
कठपुतली सम नाचू गाऊ
त्या तालावर त्या हातावर
अलिप्ततेने हसतमुखाने डाव आता संपवू
फक्त एकदा बालपणीचे सागरगोटे खेळू
फक्त एकदा बालपणीचे सागरगोटे खेळू ॥ ८ ॥

**सुमती कमलाकर देशपांडे**

# Movie Recommendations Pradeep & Rajendra




## House of Sand and Fog

| | |
|---|---|
| Directed: | Vadim Perelman |
| Based on: | A novel by Andre Dubois III (1999) |
| Cast: | Ben Kingsley and Jennifer Connelly |
| Year: | 2003 |
| Rating: | R (due to some violence/disturbing images, scenes of sensuality) |
| Runtime: | 126 minutes, |
| Genre: | Drama |

Homeownership is a cornerstone of the "American Dream". Immigrants and natives in US pursue that dream. This is a story about that pursuit when it goes awry.

Colonel Behrani (Ben Kingsley) is an Iranian immigrant who buys a foreclosed house at a bargain basement price. He plans to renovate it and sell it off at 4 times its purchase price and make a huge profit to finance his son's education and maintain his lifestyle.

The house previously belonged to Kathy Nicolo (Jennifer Connelly) who had inherited it from her father. She is an ex-alcoholic who is in rehab, a divorcee and is trying to put pieces of her life together. She is mistakenly faulted for not paying business taxes when in fact she never owned any business. She loses her house to the County through a bureaucratic error and becomes a homeless person overnight.

The ownership of the house becomes a tangled question for which there are no easy answers. Both the parties have a lot at stake and are unwilling to give up the house. The result is a tragedy. The conflict is not between parties that are ethically black and white, but between shades of grey. It is difficult to take sides. Both are right to an extent and both are wrong. It raises interesting questions about what is "legal" and what is "ethical" and how the two are different. It also raises a lot of questions about compassion for the wronged party versus relentless pursuit of money though speculation in real estate. When the audience leaves the theater, the lingering question in their minds is what the central characters could have done differently so that the outcome could have been more amicable.

There is another angle to this conflict and that is the antagonism between 1st generation immigrants and the natives in US, their different value systems and lifestyles. This is definitely not a "feel good" family movie like a typical Disney potboiler. But it provokes a lot of thought about morality in the 21st century US.

This movie is based on the best-selling novel of the same name by Andre Dubois III, published in 1999. It won some awards. It was selected by Oprah Winfrey for her book club. The movie was not as commercially successful as the novel.

This is a first movie from the director Vadim Perelman and it shows that he understands the nuances of the conflict between the central characters very well. He keeps the pace fast moving with 2 story lines moving in parallel until they collide. The story is told in a flashback fashion. The use of dark hues in photography enhances the somber mood. Ben Kingsley was nominated for Oscar (2004) for this role. He has lived this role. Jennifer Connelly evokes sympathy as a damsel in distress. The supporting cast is equally good.

If you are in a mood to watch a thought provoking movie raising disturbing questions about what is right and what is wrong, please do not miss this one.

**Pradeep Vaze**

**Rating: **** out of 5**

# Movie Recommendation by Pradeep & Rajendra




## The Illusionist

| | | |
|---|---|---|
| Director & Screenplay: | Neil Burger | |
| Based on: | Short story “Eisenheim the Illusionist” by Steven Milhauser | |
| Cast: | Edward Norton | Eisenheim |
| | Paul Giamatti | Inspector Uhl |
| | Jessica Biel | Sophie |
| | Rufus Sewell | Crown Prince Leopold |
| Release Date: | 1 September 2006 | |
| Rating: | PG-13 for some sexuality and violence | |
| Runtime: | 110 min | |
| Genre: | Drama \| Mystery \| Romance \| Thriller | |
| Awards: | Oscar Nomination (Cinematography). Another 5 wins & 5 nominations | |

The following synopsis does not contain spoilers.

In my opinion, there is no real magic in this world. Magic is an art of trickery in the way it is presented and science in the way it is executed.

It reminds me of the magic show I saw in Las Vegas. My seat was far off but I had binoculars, which gave me a better vantage point than the first row seats. I was using them all the time. Among other things that I could not figure out even through the binoculars, there was one act where a full size open car with the magician sitting in it, came from above the stage, took a turn so I could see the other side of the car, and landed on the stage. I could see no ropes around the car, and no cranes, even through the binoculars! How they do it is simply amazing!

The Illusionist, based on the central theme of magic, is very intriguing and riveting right from the start and finishes with an unexpected end leaving the audience wondering as to what was real and what was illusion. Perhaps a little analysis makes the whole story crystal clear.

In early 1900 Vienna, a young boy falls in love with a girl from the privileged class and the two are separated by society. The boy travels around the world learning magic, and becomes a well known magician. He returns to Vienna and finds an entirely different situation about his sweet heart. Does he reunite with his girl friend is the question I will not answer here. See if you in fact get the answer by the end of the movie. Also thought provoking is the question if there is real magic or if metaphysical powers play a role in magic. I am sure you will enjoy this mystery. Be sure to compare your opinion with mine as stated in the first para above.

The performances of Ed Norton as the magician, and Paul Giamatti as the inspector are exceptional.

**Rajendra Wadnerkar**

**Rating: **** out of 5**

## पुस्तक परीक्षण




पारंपारिक मराठी ललितलेखनाला अतिनाट्याचा शाप आहे असं म्हटलं तर फारशी अतिशयोक्ती होणार नाही. त्यामुळे तांत्रिक बाबीतल्या अत्यंत ढोबळ चुकासुध्दा क्षम्य मानल्या जातात. आणि माहितीपूर्ण लेखन कल्पित पात्रांच्या संवादात बसवणं हे जरी "ट्रेंडी" झाले असले तरी अशा लिखाणात नाट्य अभावानेच असते. ललितलेखनाच्या माध्यमातून माहितीपूर्ण लेखन हा प्रकार इंग्रजी कादंबऱ्यांना नवीन नाही. कादंबरीला वॉल स्ट्रीट्ची पार्श्वभूमी असो, बँकेवरच्या दरोड्याची असो किंवा कॅन्सरच्या रूग्णाची असो, लेखकाने त्या त्या विषयाचा तपशीलवार अभ्यास केलेला असतो. चोखंदळ मराठी वाचकवर्गाला अशा लेखनाची उणीव कायम जाणवत आली आहे. **"युवंता"(**http://www.yuvanta.com) ही कादंबरी लिहून **डॉक्टर मोहन द्रविड** यांनी ही उणीव भरून काढण्याच्या दृष्टीने मोठं पाऊल उचललं आहे यात शंकाच नाही.

प्रस्तुत कादंबरीची कालकक्षा जवळजवळ पन्नास वर्षांची आहे. त्यात त्या त्या वेळच्या राजकीय आणि सामाजिक घटनांचा उल्लेख आहे. वाचकांना कुतुहूल असलेल्या दररोजच्या जीवनातल्या अनेक विषयांचे तपशीलवार वर्णन आहे. पण फार तपशीलांनी मूळ कथानकाचा रसभंग होऊ नये याची लेखकाने काळजी घेतली आहे.

जिच्या अहंकाराला दंश झाला आहे अशी एक मध्यम वर्गातली देखणी तरुणी देवयानी आणि ज्याचा अहंकार सुखवायला हात जोडून वैभव उभं आहे असा पस्तिशीतला अब्जाधिश राहुल अशा दोन भिन्न प्रवृत्तीच्या, दोन भिन्न प्रकृतीच्या आणि सर्वस्वी दोन वेगळ्या परिस्थितीत वाढलेल्या दोन व्यक्तींची गाठ नशीब घालून देतं हा कथानकाचा गाभा आहे. देवयानीचं प्रेम ज्याने अव्हेरलं आहे त्या रवी साठेची कथाही इथे गुंफलेली आहे. तीस वर्षांच्या सुखी संसारानंतरही देवयानी राहुलशी एकरूप होऊ शकत नाही. अधूनमधून तिला तरुणपणाची स्वप्नं पडतात. नवऱ्याच्या निधनानंतर तिची जेव्हा रवीबरोबर भेट होते तेव्हा त्याचा संपूर्ण अध:पात झालेला असतो. त्याच्या तिच्याबरोबरच्या निर्लज्ज वागण्याने तिला किळस येते आणि तिचा भ्रमनिरास होतो.

नाविन्यपूर्ण कथा आणि खुसखुशीत लेखनशैली यामुळे ही कादंबरी रसिकांत प्रिय होईल याबद्दल मला अजिबात संदेह वाटत नाही.

**समीक्षक डॉ. प्रदीप कर्णिक**

# फरक

न्यू जर्सीत राही त्यास कशाची वानवा नाही !

खरं आहे ना ? मी २००२ साली पहिल्यांदा माझा मुलगा संदीप आणि सून सौ. दीपा ह्यांच्याकडे आले होते. त्यावेळी 'अमेरिका दर्शन' अगदी छान घेतले होते. न्यू यॉर्कला जाऊन सगळी प्रेक्षणीय स्थळे पाहून 'डोळ्यांचे पारणे फिटले' असे म्हणतानाच 'नायगारा' पाहिला ! डोळे तर दिपूनच गेले होते !

मध्यंतरी मी दोन वेळा इथे येऊन गेले पण मुक्काम अगदीच थोडा थोडा होता. त्यावेळी इथे रस्त्यावर, मॉलमधे, पटेलच्या दुकानात, अगदी देवळांतही जी गर्दी दिसायची त्यापेक्षा कितीतरी अधिक पटींनी गर्दीत वाढ झाली आहे हे प्रकर्षाने जाणवलं. आता आमच्या घराजवळ 'अपना बाजार' हे दुकानही सुरू झालं आहे. त्या दुकानात काही मिळत नाही असं नाही. अगदी पुण्यात असल्यासारखे वाटते. उलट कदाचित कच्ची केळी, केळफूल, कंटोली, परवर ह्यासारख्या भाज्या पुण्यालादेखील रोज मिळतातच असे नाही. इथे मात्र त्या रोजच मिळतात ह्याचे खरंच कौतुक वाटते.

हे सारे बघताना काही चुकीचे बदल पाहूनही वाईट वाटतं. पूर्वी रस्ते अगदी स्वच्छ असायचे, पण आता कचरा, ज्यूसचे डबे, बाटल्या, सिगारेटची थोटकं खूपच दिसली. सार्वजनिक ठिकाणच्या रेस्ट रूम स्वच्छ असायच्या पण त्याही आता तितक्याशा स्वच्छ नाहीत हे जाणवले. रस्त्यांवरच्या वाहनचालकांचा पेशन्सही गेल्या काही वर्षांत कमी झाला आहे की काय असे वाटते. अर्थात मी ही आशा करते की ही परिस्थिती सुधारून पुन्हा रस्ते, सार्वजनिक रेस्टरूम इ. पूर्वीसारखे स्वच्छ असतील.

एक उल्लेखनीय आणि चांगला बदल पाहिला तो म्हणजे 'Hidden Gems' हा music group. हा ग्रुप सामाजिक बांधिलकीचे भान ठेऊन चॅरिटीच्या कारणांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम करतो. उदाहरणेच द्यायची म्हटली तर भारतातील त्सुनामीपीडीत लोक, अमेरिकेतील कट्रीना ह्या वादळाने पीडीत लोक ह्यांच्या मदतीसाठी किंवा 'Asha For Education', 'CRY Foundation' अशा विधायक कार्य करणाऱ्या संघटनांना मदत म्हणून 'Hidden Gems' ह्या ग्रुपने हजारो डॉलर्स उभे केले. मध्यंतरी एका पार्कमधे Hidden Gems चा कार्यक्रम पाहिला. जवळपास ४०० प्रेक्षक होते आणि हिंदी सिनेमातल्या सदाबहार गाण्यांच्या ठेक्यावर अमेरिकन, रशियन प्रेक्षकही नाचत होते.

इथे राहणाऱ्या बहुसंख्य भारतीयांची नाळ भारतातच असते हे मात्र अगदी खरं आहे !

**सौ. अनघा चित्रे**

## Achievements – कौतुक



अमेरिकेच्या क्षितीजावर उगवलेली शुक्राची चांदणी ...

**कुमारी प्रियंका टोपे** लॉग आयलंड न्यूयॉर्क

वयाच्या अवघ्या १३व्या वर्षी प्रियंका टोपे हिने आपल्या मधुरवाणीचा अविष्कार म्हणून "प्रियांजली" आणि "इंद्रधनुष्य" असे दोन सी.डी. आल्बम प्रसिध्द करून खरोखरीच एक विक्रम स्थापित केला आहे.

बालवयांत केलेली ही संगीत साधना जितकी अपूर्व आहे तितकीच ती रसाळ आणि नादमधूर आहे. भारत ही संताची आणी संतवाणीची आदर्श तपोभूमी आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, मीराबाई यांच्या भावपूर्ण रचना प्रियंकाने बहारदार ढंगात गायल्या आहेत. भारतांतील विविध भाषेंत, बोलीत, मूळ आशयाला धक्का न लावता, प्रत्येक गीत एकत्र विणून त्यांची एक सलग पुष्पमाला गुंफली आहे. संत तुलसीदास, संत कबीर, ब्रम्हानंद आणि गुरूवर्य टागोर यांच्याही काही अर्थपूर्ण, नादमधुर रचना जाणत्या रसिकांपुढे बहारीने पेश केल्या आहेत.

निरनिराळ्या भाषेतील गीते एकत्र करून तिने जो इंद्रधनुचा गोफ विणला आहे त्याची मोहकता मनाला आकृष्ट करते. स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर आणि आशाताई भोंसले यांनी स्वरबध्द केलेली गाणी प्रियंकाच्या आवाजांत ऎकताना पुनःप्रत्ययाचा आनंद देऊन जाते. तिने गायलेला भगवद्गीतेचा नववा अध्याय उजवा आहे. मुळ संस्कृत श्लोकांचे शुध्द आणि सुस्पष्ट उच्चार केल्याने ऐकणा-याला अवघड वाटत नही. "कृष्णाई कन्हाई" हे गीत ऐकताना संत बहिणाबाईची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. प्रियंकाची सुरेल आवाजाला भिडणा-या गीतास गती देण्याची क्षमता, तालस्वरावर योग्य वजन देण्याची कुशलता, आवाजाची उंची व गहराई उलगडण्याची निपुणता पाहून मन अचंबित होते.

बालवयांत समर्थपणे पेललेल्या संगीत इंद्रधनुष्याचे श्रेय प्रियंकाचे गुरूजन, माता पिता, दिग्दर्शक, वाद्यवृंद साथी आणि भारदस्त, वजनदार वाणीतील ओघवते निवेदन याला जाते.

सर्वात कौतुकास्पद आणि अभिमानस्पद गोष्ट म्हणजे या संगीत साधनेंतून आलेले सर्व उत्पन्न प्रियंका टोपे जगांतील गरीब आणि गरजू मुलांसाठी स्थापित असलेल्या संस्थांना देते. त्यात युनिसेफ, CRY-America, अमेरिकन रेड क्रॉस, महाराष्ट्र फ़ाउंडेशन, America's second Harvest, Long Island Mentoring Partnership या संस्थांचा समावेश आहे. तिच्या गाण्याच्या कार्यक्रमांतून आणि वरील सीडींच्या विक्रीतून आजपर्यंत तिने तीस ते पस्तीस हजार डॉलर्स देणग्या म्हणून दिले आहेत. तिचा धाकटा भाऊ तेजस् हा सुध्दा चांगला तबला वाजवतो आणि प्रियंकाला साथ करतो.

भारतीय संस्कृतीचा वारसा मिळालेल्या या बहीण भावांचे अभिनंदन करून त्यांनी स्वीकारलेला भारतीय संगीतकलेचा वसा, परदेशांतल्या मातीत रूजवण्याचे प्रियंकाचे स्वप्न साकार होवो ही शुभेच्छा !

**रमेशचंद्र प्रधान**

## Achievements – कौतुक (Continued)



- **Dr Meena Nerurkar** won best play writer's award in the Maharashtra State vyavasayik natya spardha for her play Awagha Rang ekchi zala.It is a sangeet natak which is poduced by prabhakar Panshikar's Natyasampada. Padmashri Prasad Savkar, Ram Marathe's grand daughter Swarangi Marathe and Amol Bavdekar are acting in it. The play is receiving rave reviews. This is the first time an NRI is getting such an award.



- **Tejas Nerurkar** Son of Dr. Meena And DR Anil Nerurkar got selected in the state of New Jersey's top 40 entrepreneurs under the age 40 years. He is 28 and is a graduate of University of Pennsylvania . He started his management consulting company called optimum output 4 years ago and has br anches in Mumbai and Argentina. He also is a member of Mensa- an organization for exceptionally intelligent people.



- **Priyanka Kasbekar** understands music in a way that sometimes seems undoubtedly innate. She comes from an educated Marathi family that stressed the value of education, as well as maintaining a close tie with ones culture. So, even though Priyanka was born and raised in the United States she has an intimate relationship with both Indian classical and contemporary music. She began learning Indian classical vocal music at the age of five. Her teachers have included: Ustaad Shafaatullah Khan, Smt Shubra Guha, Smt Mitali Bhawmik, and the late Pandit M. G. Patwardhan.
  Priyanka has performed at many locations some of which include: the Kala Academy in Goa, India, Longwood Gardens, the International House at the University of Pennsylvania, multiple performances for Marathi Vishwa, Bengali and Gujarati organizations in New Jersey, and the Hindu Temple and Cultural Center in Central New Jersey. She recently was Chief Guest for Sangita Patel's annual dance school show, Valley Ke Sitare, in Allentown, PA.
  Priyanka has released two albums. Priyanka's first album, "Tamanna," was created with her philanthropic nature at heart and includes timeless Bollywood numbers. All of the proceeds from this album are donated it to a girl in India each year who has had tremendous success in her education, however does not have the means to continue her education. The first scholarship was given in her late Guruji Shri M. G. Patwardhan's name, to an impeccable student this past July attending Vivekanand College in Kolhapur, Maharashtra, India. "Pahela Pyar" is Priyanka's second, but debut album. It tells stories of romance through a series of pop songs. Bobby Chaterjee composed the music for the album and American musicians played the background score. The music is a subtle mix of classic Bollywood meets the West.
  Currently, she is pursuing a degree in Biomedical Engineering at Drexel University in Philadelphia, Pennsylvania. Priyanka realized in her early teens that what her parents once thought was just a link to her culture, had turned from a hobby and transformed into her destiny.

# तुका झालासे कळस

"याचसाठी केला होता अट्टाहास शेवटचा दिस गोड व्हावा ॥ ..." संत तुकाराम महाराजांच्या आयुष्यातील शेवटचा, गोड साजरा झालेला दिवस म्हणजे फाल्गुन वद्य द्वितियेचा दिवस. “तुकाराम बीज” या संबोधनाने मोठया भक्तिभावाने हा दिवस महाराष्ट्रात व अन्य राज्यातही आज मितीला साजरा केला जातो.

१९०८ हे वर्ष संत शिरोमणी तुकाराम महाराजांचे चतुर्थ जन्म शताब्दी वर्ष गौरव वर्ष म्हणून संपन्न होत आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. विविध क्षेत्रातील बुध्दिमंतांची भूमी आहे, कलावंतांची भूमी आहे आणि अतुलनीय पराक्रमांच्या गाथा सांगणा-या शौर्यवंतांची भूमी आहे. या भूमीत ज्ञानियांच्या राजाचे गुरु निवृत्तीनाथ, वारकरी संप्रदायाची “माऊली” ज्ञानेश्वर महाराजांपासून ते संत एकनाथ, संत नामदेव महाराजांपर्यंत अनेकानेक संत अवतरले आणि अमृतातेही पैजा जिंकणा-या अनेक महान ग्रंथाची रचना मायमराठी भाषेत करुन गेले. ग्रंथही अक्षर अमर झाले अन् ग्रंथरचनाकर्तेही. श्री ज्ञानेश्वरी, श्री एकनाथी भागवत, श्री दासबोध यासारखे अमृतमय साहित्यरुपी महान ग्रंथ निर्माण झाले.

यातूनच भागवत धर्म मंदिराची नेमकी आणि नेटकी इमारत उभी राहिली. या सुरेख मंदिराचे वैभव नजरेत भरले ते संत तुकोबारायांच्या अभंग गाथारुपी कळसामुळे ! आजही पंढरीची वारी करणारा वारकरी संप्रदायातील एखादा वारकरी वा एखादा सामान्य विठ्ठलभक्तही, काही कारणास्तव पंढरीच्या मंदिरातील विठोबाचे मुखदर्शन, पादस्पर्शदर्शन जर घडले नाही तर मंदिराच्या कळसाचे दर्शन घेऊन विठ्ठलदर्शनाचे फळ लाभले असे मानतो. केवढे कळसाचे हे माहात्म्य ! याच न्यायाने तुकाराम महाराजांच्या गाथा दर्शनाने-वाचनाने अन्य सर्व महान ग्रंथांचे सारच हाती आले असे मानायला हरकत नसावी.

"ऒवी ज्ञानेशाची । अभंग वाणी प्रसिध्द तुकयाची ।" संत तुकारामांची वाणी - अभंग गाथा - “अ-भंग” राहिली आहे हेच तिचे वैशिष्टय. त्यांच्या अभंगातून ज्ञान आणि भक्ती तसेच विवेक व वैराग्याचा सुरेख, मनोज्ञ संगम विलसतो. मराठी मनाला तो आजही भुलवतो, मोहवितो. कधी भजनाच्या आनंदात तल्लीन होत ते म्हणतात,

"घेई घेई माझे वाचे । गोड नाम विठोबाचे । "

कधी विठ्ठलाच्या नामस्मरणात तन-मनाचा विसर पडतो. ते अनन्यभावे पांडुरंगाला शरण जातात, विनवितात -

"तुज मागणे ते देवा । आम्हा तुझी चरण सेवा ।"

बस्स ! अन्य काही नको. ते म्हणतात,

"आम्हा घरी धन । शब्दांच्याच राशी ।"

म्हणूनच छत्रपती शिवाजीराजांनी पाठवलेले धन-वस्त्र-अलंकारांचा नजराणा त्यांनी परत पाठविला. आपण काय केले असते? विचार करावा.

लोकोध्दारकाचे रुप धारण करणा-या तुकोबांनी तत्त्कालीन रुढी-परंपरात फसलेल्या समाजाला प्रबोधन केलेले आहे. कधी मोठ्या प्रेमळ शब्दात तर कधी हाती पंतोजींची कडक काठी घेऊन ते ठणकावतात -

" मऊ मेणाहुनी आम्ही विष्णूदास" तरीही - "वज्रास भेदू ऎसे" - "नाठाळाच्या काठी देऊ माथा ।"

जनसामान्यांबद्दलचा कळवळा, त्यांना सन्मार्गाला लावण्याचे वेड, एक ध्यास यातूनच त्यांचे महान तत्त्व, मोठेपण दिसून येते. ते जिवाच्या आकांताने कळवळून उध्दारतात - "बुडताहे जन देखवेना डोळा। "

जाती-पाती, उच्च-नीच, गरीब-श्रीमंती, भेदभाव, समाजातील अनिष्ट रुढी, चालीरीती यावरही ते कडाडून हल्ला चढवितात. तेंव्हा त्यांची वाणी अशी विलक्षण धारदार होते की वाटते, गवताच्या पात्यांनाही त्या श्रवणाने तलवारीची तीक्ष्ण धार यावी. स्पष्ट, मोजकी, निर्भीड, सडेतोड तशीच विलक्षण अर्थवाही आणि प्रसंगविशेषी अतीव भावपूर्ण पण प्रवाही अशी संत तुकोबांची वाणी अक्षरशः काळजाला जाऊन भिडते.

"गाढवाचे घोडे। आम्ही करू दृष्टीपुढे।" - शब्दा-शब्दात केवढे सामर्थ्य आहे? शिवाय हेही जाणवल्याविना राहत नाही की या विलक्षण शब्दसृष्टीच्या परम दैवताला या श्रीमंत शब्द-सामर्थ्याचा, देवाचे देणे लाभलेल्या काव्य संपदेचा व अवर्णनीय भावभक्तीचा

आणि स्वकर्तृत्वाचा यत्किंचितही गर्व नाही. या महान वैभवसामर्थ्याचे कर्तृत्व ते आपणा स्वतःकडे घेत नाहीत हे विशेष. ते म्हणतात - " आपुलिया बळे नाही मी बोलत । सखा कृपावंत वाचा त्याची ॥"
दोन ओळी आपण लिहितो आणि सांगत राहतो - " मी लिहीलं - मी लिहीलं. "

संत तुकरामांचा जीवन काल पाहता तत्कालीन समाजाला अनिष्ट, अमंगल रुढींनी, गैरसमज-समजुतींनी चहूबाजूंनी ग्रासलेलं होतं. अंधश्रध्दा बुवाबाजी, नवस-सायास इ. प्रथा प्रकारांनी वेढलेलं होतं. त्याच्यात राजकीय अस्थिरता, असुक्षितता याबरोबरच श्री शिवरायांचे स्वराज्याचे स्वप्न साकार करण्याच्या प्रयत्नातून लढाया-झगडे व अनेक युक्त्या- प्रयुक्त्यातून सारे समाज जीवन ढवळून गेलेले होते. समाजाला सुयोग्य विचारांची नि आचारांचीही बैठक द्यायलाच हवी या ध्यासातून रात्रंदिवस धडपडणारे त्यांचे थोर व्यक्तिमत्व गगनाला गवसणी घालू पाहणारे होते हे आपणास निश्चितपणे जाणवते.

आजही तीच परिस्थिती आहे. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर - "रात्रदिन आम्हा युध्दाचा प्रसंग ।" असेच म्हणावे लागेल. आज आकाशाला भिडलेली महागाई, सर्वच क्षेत्रातील जीवघेणी स्पर्धा, सर्व व्यवहार, जीवनावश्यक नोकरी, धंदे व व्यापारक्षेत्रातील अनिश्चितता व मंदीचे भीषण सावट याबरोबरच दहशतवाद, चंगळवाद यामुळे असुरक्षितता या सर्व आणि चौफेर आघाड्यांवर सामान्य माणसाला नित्य संघर्षच करावा लागतो आहे. दैनंदिन जीवनाचा आपला मार्ग युध्दाच्या मैदानातूनच पुढे जाणारा आहे. राजकीय, समाजिक वा व्यक्तीगत हेवेदावे, द्वेष-मत्सरादि षड्रिपू हाती शस्त्र घेऊन पुढे उभे आहेतच. बाह्य शत्रू व आंतर शत्रुंशी लढाई सुरु असतेच.

"विचार बदला, जीवन बदलेल." सर्वच संत सांगत आले आहेत. म्हणूनच आज आपल्याला, समाजाला संत तुकोबांच्या उत्तुंग व्यक्तिमत्व चरित्राची, त्यांच्या अभंग गाथेतील अ-भंग विचारांची व आचरणात आणाव्या अशा उपदेशाची नितांत गरज आहे. नाती-संस्कृतीहीन विचारांच्या अज्ञान अंधःकारात चाचपडत चाललेल्या दिशाहीन नवपीढीला पारलौकिकाबरोबरच लौकिकही उत्तम साधता यावा म्हणून संत साहित्याची नितांत आवश्यकता आहे. श्री. समर्थ रामदासस्वामींच्या भाषेत - प्रपंच नेटका करताना परमार्थ नेटका कसा साधावा - या विचारांची मार्गदर्शक तत्वे तुकोबारायांच्या गाथेतून वेचण्याची जरुरी आहे.

म्हणूनच म्हणावेसे वाटते या सर्वच संतश्रेष्ठींच्या अमोल कार्यरुपी मंदिराचे कळस आहेत संतशिरोमणी तुकाराम महाराज ! आज चतुर्थजन्मशताब्दी वर्षात त्यांच्या परम पवित्र चरणी विनम्र-भावे माथा टेकताना मुखी हेच शब्द उमटतात

" तुका झालासे कळस !" - "तुका झालासे कळस !"

**श्रीमती प्रतिभा गारटकर**

## Youth Corner

**Marathi Vishwa - Wii Tournament**

After not holding any major event in a while, MV teens needed an event to warm up. We decided to hold a Wii Tournament on the day of the Ganetshotsav. We sent out an advertisement for it in the Vrutta and on the website.

After about 2 weeks, I had received only about 5 RSVPs. Slowly, a flame ignited, still flickering weakly, like it could go out at any moment. As the number of weeks quickly dwindled down to naught, the rate of RSVPs stayed constant. Still, I patiently waited. During the week of the tournament I received a huge dose of confidence by the surprisingly large amount of RSVPs.

We had around 22 prospective participants on the day of Ganeshotsav; I was expecting some last minute entrants so I printed a tournament bracket sheet of 32. We had a potent fire going and we were emboldened to carry out a successful tournament, but the biggest surprise was yet to come.

The projected number of participants had more than doubled. We had an astounding 52 participants in the Wii tournament. Managing 52 kids turned out to be a task to be reckoned with. But in the grand scheme of things, everything turned out terrific. Anay Khanapure won the first prize.

I have to thank my hardworking and resourceful team that made it possible: Jay, Hersh, Devavrat, Sunil, Indraneel, and Prav. Every kid got a fair chance to play, two skilled individuals made it to the finals and won awards, and most importantly, everyone had fun. We had a successful tournament, bringing the advent of the forth coming successful year in MV teens.

**Rohan Kshirsagar**

## मराठी विश्व गणपती २००८- भारताची आठवण



लोकांची जेवणं होत आली होती आणि सगळे हळू हळू गाण्याच्या कार्यक्रमासाठी जायला लागले होते. तेव्हढ्यात कानावर ढोल - ताशांचा आवाज आला.

दधढाण... तढाढाण... ढाण्ण ... , दधढाण... तढाढाण... ढाण्ण ...

आवाज वाढतच जायला लागला. सगळे जण जेवणाच्या हॉलबाहेर येऊन पाहू लागले. कमरेला अडकवलेले ढोल - ताशे आणि डोक्याला जास्वंदीसारख्या लाल रंगाच्या मराठमोळ्या मावळी पगड्या घातलेले आठ-दहा जण सगळे वातावरण दुमदुमून सोडत होते. लहान - मोठे सगळेजण झटक्यात एकत्र येऊन बेभानपणे ते दृष्य बघत होते. वाजवणाऱ्यांमधे तर एक आठ वर्षांचा मुलगाही होता. त्यांचे वाजवणं थांबलं आणि 'गणपती बाप्पा, मोरया sss' असा मोठा गजर सगळ्यांनी केला. न्यू जर्सीच्या गणपती उत्सवाची शान वाढवायला आपल्या शेजारच्या फिलाडेल्फिया मंडळाचे लोक ढोल - ताशे घेऊन आले होते. भारतापासून खूप लांब असूनही गणेशोत्सवाचे खरे स्पिरीट जिवंत होते !

त्यानंतर पुण्याहून आलेल्या मंजुषा कुलकर्णी - पाटील ह्यांच्या बहारदार गायनाचा कार्यक्रम होता - 'हे सुरांनो चंद्र व्हा.' त्यांनी पहिलीच बंदिश गायला सुरूवात केली आणि सगळ्यांच्या लक्षात आलं की आता 'गाणं ऐकणं' ही दुसरी मेजवानी मिळणार आहे. सडपातळ शरीरयष्टीच्या मंजुषा पाटीलांकडे नुसते पाहून अजिबात वाटलं नव्हतं की त्यांचा गाणारा आवाज इतका पल्लेदार असेल. गात असतानाही चेहऱ्यावर असलेले मंद स्मित आणि वयाच्या आठव्या वर्षीपासूनचा रियाझ ह्या दोन गोष्टींनी गाण्याला रंग चढू लागला.

रसिकांचा एकंदर मूड ओळखून शुद्ध शास्त्रीय गाण्यापेक्षा त्यांनी भावगीत, ठुमरी, नाट्यगीत, बैठकीची लावणी असे वेगवेगळे प्रकार सादर केले. ठुमरी सुरू झाली की रसिक तल्लीन व्हायचे आणि भावगीताला जणू हिंदोळ्यावर झुलायचे.

त्यांच्या साथीला तबल्यावर भरत कामत होते जे अगदी सवाई गंधर्व महोत्सवातही साक्षात पं. भीमसेन जोशींना साथ करतात. हार्मोनियमची साथ करायला अजून वयाची पंचविशीही न गाठलेले तन्मय देवचके ! 'कला' हे क्षेत्र आहे जिथे वयापेक्षा हातातल्या कलेला जास्त मान असतो. तो मान तन्मय देवचकेंनी नक्कीच मिळवलाय.

'बैठकीची लावणी' हा ऐकायला दुर्मिळ प्रकार सादर करताना मंजुषा पाटीलांनी आवर्जून सांगितलं की त्या ही लावणी मुंबईचे डॉ. अशोक रानडे ह्यांच्याकडून शिकल्या. ज्याचं क्रेडिट त्याला देण्यात मनाचं मोठेपण असतं.

कार्यक्रमाचे नाव ज्या नाट्यगीतावरून ठेवलं होतं, ते नाट्यगीत 'हे सुरांनो चंद्र व्हा.' पं.जितेंद्र अभिषेकींची पदोपदी आठवण करून देणारं ते नाट्यगीत खूपच छान रंगलं. पण त्या पूर्ण कार्यक्रमातील सर्वोत्कृष्ट सादरीकरण म्हणजे 'वद जाऊ कुणाला शरण..' हे नाट्यगीत. एकापाठोपाठ एक अशा सरसरत येणाऱ्या ताना मनात साठवून ठेवणं म्हणजे निखळ आनंद होता. हे पद संपल्यावर संपूर्ण सभागृहाने मंजुषा पाटील ह्यांना standing ovation दिलं.

अत्यंत थोड्या दिवसांचा विनंतीला मान देऊन न्यू जर्सीला आल्याबद्दल मंजुषा पाटील ह्यांचे आभार आणि त्यांनी असेच उत्तमोत्तक कार्यक्रम आपल्या न्यू जर्सीत करावेत ही विनंती.

**संदीप चित्रे**

# संगीताचे कार्यक्रम



सप्टेंबर महिन्यात दोन दर्जेदार महाराष्ट्रीय कलाकारांचे संगीताचे कार्यक्रम ऐकायला मिळाले. पहिला म्हणजे न्यू जर्सीच्या महाराष्ट्रीय मंडळातल्या गणपती कार्यक्रमात सौ मंजुषा कुळकर्णी-पाटील यांचा. सौ कुळकर्णी मंचावर येताना त्यांच्या शरीरयष्टीकडे पाहून मला जसं वाटलं तसं कित्येक रसिकांना वाटलं असेल की सौ. मंजुषा काय गाणार? पण पहिलाच षड्ज लावल्यावर कल्पना आली की त्यांनी आपल्या गुरूकडून चांगलीच तालीम घेतली आहे. त्यांचे एक गुरू कै. नरेंद्र कणेकर हे माझ्या चांगल्या परिचयाचे होते कारण ते मुंबईत दादरला हिंदु कॉलनीत माझ्या जवळ रहात होते व त्यामुळे माझा त्यांच्याशी घरोबा होता. सौ. कुळकर्णींनी आपल्या पहिल्याच गाण्यात श्रोत्यांच्या मनाची चांगलीच पकड चेतली. ती ब्रिंदावनी सारंग रागातली द्रुत चीज अशी काय सादर केली की हॉलमधल्या सर्व श्रोत्यांचं लक्ष त्यांच्याकडे केंद्रीत झालं होतं. रागातली सरगम अतिशय परिणामकारक व सहज म्हटली. हळुहळु मैफल जमत गेली, त्या नंतर नाट्यगीत, भजन व ठुमरी गाऊन त्यांनी श्रोत्यांना अगदी मंत्रमुग्ध करून सोडलं. त्यांनी असंच गाऊन श्रोत्यांना भरपूर आनंद द्यावा व येत्या काळात नुसत्या महाराष्ट्रातच नव्हे तर पूर्ण भारतात एक तयारीची महाराष्ट्रीय गायिका म्हणून नावलौकिक मिळवावा ही ईश्वरचरणी प्रार्थना.



दुसरा कार्यक्रम म्हणजे श्री सतीश व्यास यांचा प्लेन्सबरोच्या स्वामी चिन्मयानंद मिशनच्या हॉलमध्ये संतूरवादनाच. श्री व्यासानी संतूरवर राग रागेश्री हा फार तयारीने सादर केला. सर्वसामान्य रसिकांच्या माहितीसाठी लिहीणं क्रमप्राप्त आहे की पद्मश्री श्री सतीश व्यास हे पंडीत कै. सी. आर. व्यास या नावाजलेल्या गवयांचे सुपुत्र व सध्याचे प्रसिध्द संतूरवादक श्री शिवकुमार शर्मा यांचे शिष्य आहेत. संतूर हे कश्मिरी वाद्य श्री शर्मानी प्रथम महाराष्ट्रात व नंतर इतर ठिकाणी पुष्कळच प्रसिध्दीस आणलं. खरं म्हटलं तर या वाद्यात, सतारीत किंवा सारंगीत एकाला एक सूर जोडून मिंडकामासारखे वाटत नाही. तरीसुध्दा श्री व्यासानी कमालीच्या तयारीने रागेश्री मधलं धैवत सुराचं प्राधान्य दाखवलं. त्यांना तबल्यावर अखिल भारतीय ख्यातीचे तबला वादक पंडीत श्री आनंदो चॅटर्जी यांनी साथ केली होती. ते नुसता ठेका धरून नाही बसले, तर त्यांनी कार्यक्रमात जिवंतपणा आणला व कमालीचा रंग भरला असं म्हणावं लागेल. पंडीत श्री शिवकुमार शर्मानंतर, श्री व्यास या एका महाराष्ट्रीयन कलाकाराने या कश्मिरी वाद्यावर येवढं प्रभुत्व मिळवलं आहे ही अतिशय स्तुत्य गोष्ट आहे. भावी काळात त्यांनी श्रोत्यांचं असंच मनोरंजन करावं व भारतात श्री शर्मा सारखं नाव कमवावं ही ईश्वराकडे प्रार्थना.

**श्री सुजन राणे**
**शास्त्रीय गायक**

## Fitness

**Tip # 1:**
Never exercise at someone else's capacity, not even your sweet-heart.

The optimum way to get the most from exercise is to workout at maximum capacity plus a little more. For example, if we measure endurance in number of miles one can run, and if someone regularly runs say 3 miles, his or her endurance can be increased by running just 0.1 miles more than the previous running workout, of course limited only by the time available.

If husband and wife are exercising together, and the husband's capacity is to run 3 miles, but the wife can only run 1 mile (sorry ladies, no sexism meant, but that is usually the reality), it is a good idea for each to workout according to his/her individual capacity rather than running together. If the husband runs just 1 mile to match with the wife, he will under-train and eventually reduce his endurance to a mile. On the other hand, if the wife tries to catch up with the husband in order to complete 3 miles with him, she will over-train and get unduly exhausted.

To make the point very clear, it will not be in the best interest of both of us, if I practice tennis with Federer. I will just run around without being able to return any deliveries from Federer, and he will not improve his game if I cannot deliver good shots at him. I will need to find a practice partner whose game is equal or a few notches better than mine.

**Rajendra Wadnerkar**

## मनोगत

भारत आणि भारताबाहेर हिंदू समाजातील व्यक्तींचा, वेदशास्त्र, स्त्रोत्र, श्लोक आणि आवश्यक ते मंत्रोच्चार या गोष्टींकडे पाहण्याचा कल कमी दिसून येत आहे. त्यामुळे आता व जी येणारी पिढी आहे, यांच्यामधे हिंदू संस्कृती व सुचित प्रवृती निर्माण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

हल्ली या गोष्टींची जाणीव जास्त प्रमाणात होते. आजकालच्या बहुधा सर्व लहान मुलांमध्ये वर नमुद केलेल्या गोष्टींचा अभाव दिसून येतो. भारतामध्ये सतत सणवार, व्रतवैकल्ये सुरुच असतात. त्यामुळे मुलांच्या नकळत त्यांच्यावर संस्कार घडत असतात. परंतु भारताबाहेर मात्र, थोड्याफार प्रमाणात का होईना, पण मराठी संस्कृतीची ओळख व्हावी याची विशेष काळजी घ्यावी लागते, विशेष प्रयत्न करावे लागतात. काही अपवाद असेही बघितले की ज्यांच्या घरात मुले अगदी व्यवस्थित मराठी बोलू शकतात आणि त्यांना भारताबाहेर राहूनही भारतीय संस्कृतीची जाण आहे.

मराठी संस्कृती जोपासण्यात मराठी विश्व संस्थेचाही मोठाच हातभार आहे, असे म्हणायला हरकत नाही. माझ्या या ६ महिन्याच्या वास्तव्यात मराठी विश्व चा "वसंतोत्सव" बघायला मिळाला. या कार्यक्रमामधे कित्येक लहान मुलांनी भाग घेतला आणि भारतीय संस्कृतीचं अतिशय मनोवेधक दर्शन घडवलं. यात त्यांनी संतदर्शन आणि त्यांच्या शिकवणी, नृत्य, नाटिका, गाणी अशा कितीतरी निरनिराळ्या प्रकारच्या कार्यक्रमांमधून आपल्या संस्कृतीचं दर्शन घडवलं. यांत आईवडीलांचं आणि शिक्षकांचं जेवढं कौतुक करावं तेवढं थोडंच आहे.

मराठी विश्व संस्थेला माझ्या मनापासून शुभेच्छा !!

**डी. जे. कुलकर्णी**
**निवृत्त प्रमुख अग्निशमन अधिकारी, मुंबई**

# शेवटचं पान

**भोजन प्रपंच आणि पंचाईत**

आयत्यावेळी जेवायला येणा-या पाहुण्यांमुळे आणि "आम्ही येऊ" असं सांगून न आलेल्या पाहुण्यांमुळे आपली काय धांदल, गडबड उडते, याचा अनुभव आपण कधी घेतला आहे कां?

मराठी-विश्वच्या गणपती आणि दिवाळी भोजनासाठी RSVP चा आग्रह कार्यकारिणीने सातत्याने धरल्यामुळे, एक फायदा असा झाला की बहुतांशी RSVP आपण weblink वापरुन देऊ लागलो. मग तुम्ही म्हणाल की आता तुमची काय पंचाईत झाली....right?

आता यादीच करायची झाली तर....

१. यावर्षीचा मराठी विश्वच्या गणपती प्रसाद भोजनाचा RSVP count: १६००,
मात्र गणपती प्रसाद भोजनास हजेरी : १२६०

२. सुमा फुडस(आपले यावर्षीचे केटरर्स) आणि म.वि.कार्यकारिणी यांमधे भोजन पुरेल कां उरेल यावर उलट-सुलट चर्चा होऊन अंदाज बांधावे लागले.

३. RSVP देऊन प्रसाद भोजनास अनुपस्थित राहिलेल्यांनी आमचे गणित चुकवले.

४. भोजन वाढणा-या स्वयंसेवकांचा गोंधळ उडवून दिला.

५. सुमा फुडस् ला आयत्यावेळी पदार्थांची quantity adjust करावी लागली.

६. लवकर जेवायला बसलेल्या लोकांना भोजन कमी पडले.

७. काही पदार्थ मोठ्या प्रमाणावर उरले.

आता दिपावली निमित्त होणा-या मराठी-विश्वच्या भोजनासाठी कृपया RSVP ची तसदी घ्या.........
आणि आपण RSVP दिलीत, तर नक्की येणार नं ?

**स्नेहल वझे**



